


# बसवा आणि प्रकाशाचे ठिपके


कथा : राधिका चड्ढा

चित्रे : भक्ती फाटक

अनुवाद : स्नेहलता दातार



ज्योत्स्ना प्रकाशन



# बसवा

आणि

# प्रकाशाचे ठिपके


कथा : राधिका चड्ढा

चित्रे : भक्ती फाटक

अनुवाद : स्नेहलता दातार

ज्योत्स्ना प्रकाशन


तुम्ही जर कधी मसिनाहळ्ळीच्या
घनदाट अरण्यात गेलात,
तर बसवाला जरूर भेटा.
तो तुम्हांला त्याच्या मित्रांची,
प्रकाशाच्या ठिपक्यांची नवलकथा सांगेल.



बसवाला शोधणं अगदी सोप्पं आहे. तिथल्या जंगलालगतच्या गावात तो आपल्या आईबरोबर एका लहानशा झोपडीत राहतो.

रोज जंगलातली लाकडं गोळा करून तो आईला मदत करतो. स्वयंपाक करण्यासाठी किंवा शेकोटीसाठी त्यांना लाकडं लागतात.

तो लाकडं आणण्यासाठी सकाळी निघाला की आई रोज त्याला सांगते, ''बसवा, सूर्यास्त होण्यापूर्वी तुला घरी परत यायला हवं.''



पण एक दिवस त्याला घरातून निघायलाच थोडा उशीर होतो.

जंगलात गेल्यावर त्याने भराभर काम करायला सुरुवात केली. लवकरात लवकर काम संपवून त्याला अंधार पडण्यापूर्वी घरी पोचायचं होतं.

तितक्यात त्याला एक नाजूकसा आवाज ऐकू आला, ''वाचवा... वाचवा!''

बसवाने आजूबाजूला पाहिलं, पण त्याला कुणीच दिसलं नाही.

''कुणीतरी वाचवा हो मला!'' तो नाजूक आवाज त्याच्या डोक्यावरून येत होता.



बसवाने वर बघितलं. झाडावरच्या एका कोळ्याच्या जाळ्यामध्ये, एक फुलपाखरू अडकलं होतं.

बसवाने हातातल्या काटक्या खाली ठेवल्या. बाजूला पडलेलं एक पीस उचललं आणि अगदी हळुवारपणे फुलपाखराचे पंख सोडवले. फुलपाखराने पंख फडफडवले. त्याला आनंद झाला. त्याला आता पुन्हा उडता येणार होतं.

''आज तू माझे प्राण वाचवलेस. तुला जर माझी कधी मदत लागली तर फक्त मला हाक मार,'' असं म्हणत ते फुलपाखरू उडून गेलं.

बसवाला वाटलं, हे इवलंसं फुलपाखरू मला कसली मदत करणार!



त्याने पुन्हा लाकडं गोळा करण्याचं काम सुरू केलं.

थोड्या वेळानं पुन्हा एक नाजूक आवाज ऐकू आला. ''वाचवा... वाचवा!''

बसवाने इकडेतिकडे नजर टाकली, पण कुणीच दिसलं नाही.

''कुणीतरी मदत करा हो मला!'' तो आवाज बसवाच्या पायाजवळून येत होता.

त्याने खाली पाहिलं. एक इवलासा चतुर कीटक पाण्यात बुडत होता.

बसवाने पिंपळाचं एक पान घेऊन अलगदपणे चतुराला बाहेर काढलं. मावळत्या सूर्याच्या किरणांत त्याने ते पान ठेवलं. थोड्याच वेळात चतुराचे पंख कोरडे झाले, त्याला उडता येऊ लागलं.



झुंऽऽऽऽ झुंऽऽऽऽ हंऽऽऽ- बसवाच्या डोक्याभोवती चतुर आनंदाने घिरट्या घालू लागला.


"तू माझा जीव वाचवलास, केव्हाही तुला माझी मदत लागली तर मला लगेच हाक मार," चतुर कृतज्ञतेने म्हणाला व भुर्रकन उडून गेला.

'हा कसली मला मदत करणार!' बसवा पुटपुटला.

'आता मला मदत हवीय ती आणखी लाकडं जमवायला. आज मला अजून पुरेशी लाकडं मिळाली नाहीत. आता जंगलात आणखी आत जायला हवं.'

तो दाट जंगलाच्या दिशेने चालू लागला. आजपर्यंत तो इतक्या दाट झाडीत कधीही शिरला नव्हता. तिथे वाळलेल्या ढलप्या नि काटक्यांचा अगदी खच पडला होता. तो पटापट ती लाकडं गोळा करू लागला.

त्यांची जाडजूड मोळी बांधून ती डोक्यावर घेताना त्याच्या लक्षात आलं...



... काळोख पडू लागला आहे.


सूर्य मावळून बराच वेळ झाला होता. तो घराच्या दिशेने चालू लागला. थोड्याच वेळात पूर्ण अंधार झाला. बसवा घाबरला. आता परतीची वाट कशी सापडणार?

"कोणी आहे का? मला वाचवा!" तो ओरडू लागला.

पण रानात फक्त अंधार नि शांतता होती.

"कुणीतरी वाचवा हो मला!" तो मोठ्याने ओरडत होता.

आणि काय आश्चर्य, एक नाजूक आवाज त्याच्या जवळ येऊन म्हणाला, "काय झालं?"



बसवाने वाचवलेलं ते फुलपाखरू परत आलं होतं. त्याच्याबरोबर तो चतुरही होता.

''मला घरी जायचंय, पण इथे तर मिट्ट काळोख आहे. मला वाटच दिसत नाही!''

''थांब हं इथेच!'' चतुर म्हणाला आणि ते दोघंही उडून गेले.

'हे कशी काय मला मदत करणार?' बसवाला नवल वाटलं. तरी तो तिथेच उभा राहिला.

फुलपाखरू आणि चतुर लवकरच परत आले. त्यांच्या बरोबर एक काजवा होता.

''हा आमचा मित्र, काजवा. हा तुला मदत करेल,'' ते दोघं म्हणाले.

''कशी?'' बसवाने विचारलं.




“आता जरा माझ्याकडे बघ!” काजवा म्हणाला आणि त्याने एक लांबलचक श्वास घेतला.

बसवा चकितच झाला. काजवा चमकायला लागला. त्याचे सारे शरीर दिव्यासारखे उजळत होते. त्या काळ्या अंधारात तो चमचमत होता.

“वा, किती सुंदर! पण हा इतकासा प्रकाश मला घरी जायला कसा पुरेल?”

“थांब तर खरा!” काजवा म्हणाला आणि तो अंधारात दिसेनासा झाला.




थोड्याच वेळात काजवा परत आला, त्याच्या मागोमाग जंगलातले अनेक काजवे येत होते. प्रत्येक जण म्हणजे एक चमकणारा ठिपका होता.

ते येत राहिले. हजारोंच्या संख्येने आलेले ते सगळे ठिपके एकत्र झाले. जणू काही आकाशातल्या चांदण्यांची एक चादरच विणली होती.

सगळं जंगल उजळून निघालं...

आणि त्या उजेडात बसवाला वाट दिसायला लागली! तो घरी निघाला.

पाऊलवाटेवरून परत जाताना बसवाच्या आजूबाजूला काजवे उडत होते आणि त्याला रस्ता दाखवत होते. फुलपाखरू आणि चतुर मात्र जरा दुरून उडत होते.



मग बसवाने आईला जंगलात काय काय झालं ते सगळं सांगितलं. दुसऱ्या दिवशी साऱ्या गावाने ही गोष्ट ऐकली.

तुम्ही जर कधी मसिनाहळ्ळीला गेलात ना, तर तुम्हांलाही तो ही गोष्ट सांगेल. कदाचित त्या दाट जंगलात घेऊनही जाईल, आणि फुलपाखरू, चतुर आणि ते प्रकाशाचे ठिपके या त्याच्या मित्रांशी तुमची ओळखसुद्धा करून देईल.



बसवा लाकडं गोळा करण्यासाठी
रोज जंगलात जात असे.
एकदा त्याला जायला खूप उशीर झाला
आणि तो जंगलात असतानाच काळोख पडला.
अंधारात त्याला घरचा रस्ता दिसेना.
पण अचानक त्याचे काही अनोखे मित्र
त्याच्या मदतीला आले आणि
त्यांनी त्याला सुखरूप घरी आणलं.

तुम्ही जर कधी मसिनाहळ्ळीला गेलात,
तर बसवाला जरूर भेटा.
तो तुम्हांला ती प्रकाशाच्या ठिपक्यांची
नवलकथा सांगेल.


ज्योत्स्ना प्रकाशन

ज्योत्स्ना प्रकाशन
'धवलगिरी', ४३०-३१ शनिवार पेठ, पुणे ४११०३०
मोहन बिल्डिंग, १६२ ज. शंकरशेठ मार्ग, गिरगांव, मुंबई ४००००४
www.jyotsnaprakashan.com

9788179251997